मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३४२ वा ● सोमवार, ता. ३० जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे
ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र,
समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश सुरु

माध्यम क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्ण संधी

बॅचलर इन जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन (B.Voc JMC)

- अभ्यासक्रम कालावधी: 03 वर्षे (१ ले वर्ष - सर्टिफिकेट, २ रे वर्ष - डिप्लोमा, तिसरे वर्षे - पदवी)
- पात्रता: 12वी उत्तीर्ण किंवा कोणत्याही शाखेचा डिप्लोमा
- प्रवेश क्षमता: ५०
- यूजीसी प्रायोजित अभ्यासक्रम
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न
- माध्यम क्षेत्रातील नामांकित शैक्षणिक संस्था
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक
- सुसज्ज मीडिया सेंटर
- 60% प्रॅक्टिकल, 40% थेअरी
- नामांकित प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यम समूहाशी करार

मिडीयामधील करिअरच्या संधी

कंटेंट रायटर, न्यूज अँकर, ग्राफिक डिझायनर, व्हिडिओ एडिटिंग, मार्केटिंग, जाहिरात, रेडिओ जॉकी, जनसंपर्क, डिजिटल मार्केटिंग

प्रवेशासाठी संपर्क

सीएसआरडी कॅम्पस, अहमदनगर महाविद्यालया समोर, स्टेशन रोड, अहिल्यानगर - ४१४००१

0241-2346328 csrd.iswr@gmail.com www.csrd.edu.in

## मराठीच्या अस्तित्वासाठीची दुसरी लढाई!



कुमार कदम
९८६९६१२५२६

महाराष्ट्रसंवाद

महाराष्ट्र सरकारने राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषेची सक्ती केल्याच्या विरोधात माझे मित्र डॉ. दीपक पवार यांनी त्यांच्या शालेय शिक्षण अभ्यास कृती समन्वय समितीतर्फे पत्रकार भवनात शिक्षण तज्ज्ञ, भाषा अभ्यासक, राजकीय नेते आणि मराठी जनतेच्या उपस्थितीत आज, रविवारी एका जाहीर सभेचे आयोजन केले होते. त्याचप्रमाणे शिवसेनेचे उध्दव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी अनेक वर्षाचे आपले मतभेद बाजूला ठेऊन मराठीच्या याच मुद्द्यावर येत्या ५ जुलै २०२५ रोजी एका मोर्चाचे आयोजन केले आहे. मराठीवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधातील हे असंतोषाचे वातावरण महाराष्ट्रात पुन्हा एकदा तयार झाले आहे. या पार्श्वभूमीवर माझ्या नेतृत्वाखाली मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने बेचाळीस वर्षापूर्वी म्हणजे ७ मार्च १९८३ रोजी मुंबईच्या दूरदर्शनवर केंद्रावर काढण्यात आलेल्या मोर्चाची मला आठवण झाली. या मोर्चामुळे केंद्र सरकारला दूरदर्शनवर खास मराठीसाठी दुसऱ्या स्वतंत्र चॅनलची निर्मिती करावी लागली. हा यशस्वी लढा महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक भाग बनला आहे आणि त्यासाठी माझे प्रयत्न कामी लागले याचा मला खूप खूप अभिमान आहे. त्यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचा मी अध्यक्ष होतो.दूरदर्शनच्या कार्यक्रमांमध्ये मराठी भाषेची गळचेपी केले जाते, असे आढळून आल्यामुळे त्या विरोधात मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी दूरदर्शनवर मोर्चा काढावा, असे निश्चित केले. मात्र या मोर्चाला कोणत्याही परिस्थितीत राजकीय रंग येणार नाहीत याची पुरेपूर दक्षता घेतली गेली. या मोर्चाला सर्वकष स्वरूप देण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार संघात मुंबईतील सर्व मराठी संघटनांचे पदाधिकारी आणि महत्त्वाच्या व्यक्तींची बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीत मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे, मराठी चित्रपट महामंडळ, मराठी नाट्य परिषद, मुंबई महानगर साहित्य संमेलन, मराठी वृत्तपत्र लेखक संघ, अखिल भारतीय मराठा महासंघ, स्थानिय लोकाधिकार समिती, कोकण विकास आघाडी, ग्रंथाली वाचक चळवळ, त्याचप्रमाणे संगीतकार स्व. सुधीर फडके, अभिनेते स्व. दाजी भाटवडेकर, स्थानिय लोकाधिकार समितीचे नेते स्व. सुधीरभाऊ जोशी आदी दिग्गज मंडळी सहभागी झाली होती. या बैठकीत माझ्या अध्यक्षतेखाली ''मुंबई मराठी पत्रकार संघ पुरस्कृत दूरदर्शन मराठी अन्यायविरोधी संघर्ष समिती''ची स्थापना करण्यात आली आणि लढ्याला अंतिम स्वरूप देण्यात आले. या मोर्चाला राजकीय रंग येऊ नये म्हणून शिवसेनेसह सर्व राजकीय पक्षांना मोर्चापासून दूर ठेवण्यात आले होते. अपवाद फक्त शिवसेनेची स्थानिय लोकाधिकार समिती आणि तिचे अध्यक्ष सुधीरभाऊ जोशी यांचा केला गेला होता. तरीही मुंबईतील सर्व राजकीय पक्ष तसेच अखिल भारतीय माथाडी कामगार युनियन, दत्ता सामंत यांची कामगार आघाडी, इतर कामगार संघटना, क्रीडापटूंच्या विविध संघटना यांनी मोर्चाला पाठींबा जाहीर केला. दादरच्या सिध्दीविनायक मंदिराशेजारच्या साने गुरूजी उद्यानापासून ते मुंबई दूरदर्शन केंद्र एवढ्या अंतराचा हा मोर्चा होता. पण त्यात लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले. इतकेच नव्हे तर मुंबई महानगर पालिकेची त्या दिवशीची सर्वसाधारण सभा तहकूब करून सर्व नगरसेवक महापौर स्व. डॉ. मनमोहनसिंग बेदी यांच्या नेतृत्त्वाखाली मोर्चात सामिल झाले. मोर्चा अत्यंत शांततेने नेण्याचे आमच्या बैठकीत ठरले होते. मोर्च्यातील घोषणाही तशाच पध्दतीच्या असाव्यात असेही निश्चित केले गेले होते. पण मोर्च्याला सुरूवात झाली आणि उत्साही नगरसेवक छगन भुजबळ यांनी ''जला दो, जला दो, दूरदर्शन केंद्र जला दो !'' अशी घोषणा दिली आणि वातावरण एकदम गंभीर झाले. या घोषणेमुळे बाबूजी म्हणजे सुधीर फडके खूप अस्वस्थ झाले. ते धावत माझ्याकडे आले आणि म्हणाले की, ''कदम ही घोषणा प्रथम थांबवा, या मोर्च्याला एक प्रतिष्ठा लाभली आहे, ती कोणाला घालवू देऊ नका''. मी लागलीच भुजबळ यांच्याकडे गेलो आणि त्यांना घोषणा थांबविण्याची विनंती केली, पण ऐकतील ते भुजबळ कसले. ते म्हणाले, ''बाबूजींना सांगा, ताक पिऊन लढाई करता येत नाही''. मग मला अक्षरशः गयावया करायला लागली. इतर थोर मंडळींनीही मध्यस्थी केली आणि भुजबळांना शांत केले.मोर्चा खूपच चांगला आणि यशस्वीही झाला. मोर्च्याच्या वतीने दूरदर्शन केंद्राचे तत्कालीन संचालक श्री. तातारी यांना (हे काश्मिरी गृहस्थ होते) शिष्टमंडळातर्फे निवेदन देण्यात आले. त्याचप्रमाणे नंतर तत्कालीन केंद्रीय माहिती आणि नभोवाणी मंत्री एल.के. भगत यांचीही भेट घेण्यात आली. मोर्च्याची खूप गांभीर्याने दखल घेतली ती महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांनी !मोर्चा संपला आणि मी हिन्दुस्थान समाचार मध्ये माझ्या ड्युटीवर गेलो. थोड्याच वेळात राज्याचे तत्कालीन गृहसचीव स्व. बी.के. उर्फ बापूसाहेब चौगुले यांचा मला लँडलाईनवर फोन आला. ते म्हणाले, ''मुख्यमंत्र्यांना तुमच्याशी बोलायचे आहे.'' दादा फोनवर आले. मला म्हणाले, ''मी आता दिल्लीला निघालो आहे, तुमच्या संघर्षाचे गांभीर्य मी पंतप्रधानांच्या, (तेव्हा स्व. इंदिराजी पंतप्रधान होत्या) कानी घालतो. प्रश्न तुमचा नाही, महाराष्ट्राचा आहे, तो मी सोडवून घेतो. पण तुम्ही आता या प्रश्नाला अधिक धार देऊ नका, असे माझे सांगणे आहे.'' मी दादांना ''ठीक आहे,'' असे म्हटले.काही दिवसातच तत्कालीन केंद्रीय माहिती आणि नभोवाणी राज्यमंत्री स्व. विठ्ठलराव गाडगीळ मुंबईला आले. त्यांनी मला मलबार हिलवरील सह्याद्री गेस्ट हाऊसवर बोलावून घेतले आणि लवकरच मुंबई दूरदर्शन केंद्रावरून खास मराठीसाठी दुसरे चॅनेल सुरू केले जाणार असल्याची माहिती दिली. हा मुंबई मराठी पत्रकार संघ आणि त्याने पुरस्कृत केलेल्या दूरदर्शन मराठी अन्यायविरोधी संघर्ष समितीचा खऱ्या अर्थाने आणि प्रचंड विजय होता. या समितीच्या मोर्चाला सर्व थरातील मराठी माणसांकडून जसा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला, तसा प्रतिसाद यावेळीही मिळावा ही अपेक्षा!




*छायाचित्रात दुसरी रांग – विजय पर्वतकर, आर.टी. कदम, महापौर मनमोहन सिंग बेदी, मधू देवळेकर, दाजी भाटवडेकर. तिसऱ्या रांगेत देवळेकर यांच्या मागे आत्माराम सावंत दिसत आहेत.*





## हिंदी सक्तीविरोधात मराठी मुंबई आक्रमक

### आझाद मैदानात सरकारी आदेशाची 'होळी'




**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील शालेय शिक्षणात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या सरकारी आदेशाविरोधात मुंबईच्या आझाद मैदानात आज जोरदार आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनादरम्यान संबंधित आदेशाची प्रतीकात्मक 'होळी' करण्यात आली. यावेळी मराठी भाषा, अस्मिता आणि शिक्षणाचा हक्क यासाठी मराठी जनतेने एकजुटीचे दर्शन घडवत वज्रमूठ उभारली. या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत यांच्यासह पक्षाचे अनेक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मराठी शाळांवर हिंदी सक्तीचा निर्णय म्हणजे थेट महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आक्रमण असल्याचा घणाघात या नेत्यांनी केला. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, मराठी भाषेला मागे टाकून हिंदी सक्ती लादणे हे महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाव आहे. आम्ही हे खपवून घेणार नाही. महाराष्ट्राची ओळख आणि संस्कृती वाचवण्यासाठी हे आंदोलन गरजेचे होते. आदित्य ठाकरे यांनी शालेय शिक्षणात मातृभाषेचा प्रथम प्राधान्यक्रम असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. ''मराठी शाळांमध्ये पहिल्यापासून हिंदी सक्ती म्हणजे शिक्षण स्वातंत्र्यावर गदा आणणारा प्रकार आहे, असे ते म्हणाले. या आंदोलनाने पुन्हा एकदा मराठी भाषा, संस्कृती आणि शिक्षण स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर एकत्र येण्याची ताकद दाखवून दिली आहे. सरकारने हा आदेश त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. अन्यथा हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## शेतकऱ्यांच्या वापरातल्या भूगर्भातील पाण्यावर कर?



### राजू शेट्टींचा केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत हल्ला

**सांगली | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांनी शेतीसाठी वापरलेल्या भूगर्भातील पाण्यावर कर लावण्याचा विचार केल्याच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. शेतकऱ्यांवर सुलतान काळात जसा जीझिया कर लावण्यात आला होता, तसा अन्यायकारक कर केंद्र सरकार लावू पाहत आहे, असा आरोप शेट्टी यांनी केला.

जलसंसाधन मंत्रालयाकडून असा प्रस्ताव समोर आला असून, देशभरातील शेतकऱ्यांनी विहीर व कुपनलिकांद्वारे शेतीसाठी वापरलेल्या पाण्यावर कर आकारण्याचा विचार चालू असल्याची माहिती मिळत आहे. यावर संताप व्यक्त करताना शेट्टी म्हणाले, शेतकऱ्यांनी स्वतः च्या पैशातून विहिरी व बोरवेल्स खोदून, पाईपलाईन टाकून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून घेतले आहे. यात केंद्र वा राज्य सरकारने कोणतेही योगदान दिलेले नाही.

ते पुढे म्हणाले की, उलटपक्षी देशभरातील नद्या आणि भूगर्भातील पाणी प्रदूषित करण्याचे काम अनेक उद्योगांनी केले आहे. केंद्र सरकारने या प्रदूषणाबाबत कधीही आवाज उठवलेला नाही. शेतकरी मात्र आपल्या शेतीच्या माध्यमातून वातावरणातील हानिकारक वायू शोषून घेतात आणि ऑक्सिजनसारखे जीवनदायी घटक निर्माण करतात. त्यामुळे खरे कार्बन क्रेडिटचे मानकरी शेतकरीच आहेत.

राजू शेट्टी यांनी सरकारला इशारा दिला की, जर सरकारला पाण्याचा अपव्यय थांबवायचाच असेल, तर त्याने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन त्यांच्या पाण्याच्या वापराची आणि पर्यावरणीय योगदानाची हिशेब घेण्याची तयारी ठेवावी. अन्यथा, शेतकरीविरोधी धोरणांचा सरकारला गंभीर राजकीय फटका बसू शकतो.शेट्टी यांच्या या विधानामुळे देशभरात पुन्हा एकदा शेतकरी हक्कांचे आणि धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे वातावरण तयार होण्याची शक्यता आहे.

### हिंदी सक्तीचा निर्णय मागे

## मराठी एकजूटीपुढे सरकारची सपशेल माघार



**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील फडणवीस सरकरने केंद्र सरकारच्या छुप्या अजेंड्यानूसार चालू केलेला पहिल्या इयत्तेपासून हिंदी विषय अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे घेतला आहे. मराठी भाषिक संघटना, मराठी पत्रकार, विचारवंत, समाजसेवक आणि विरोधी पक्षांच्या तीव्र विरोधानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी सक्ती निर्णय रद्द केला असल्याचे जाहीर केले. राज्य मंत्रिमंडळाची रविवारी यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक झाली. बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले, ता. १६ एप्रिल व १७ जून रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय (जीआर) रद्द करण्यात आले आहेत. यासोबतच, त्रिभाषा सूत्र लागू करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाणार आहे. या समितीत इतर काही सदस्यही असणार असून त्यांची नावे लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत. समितीच्या अहवालानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.मराठी अभ्यास केंद्र, कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), मनसे आणि इतर मराठी संघटनांनी हिंदी सक्तीविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. मनसेने ता. ५ जुलै रोजी 'महामोर्चा' काढण्याची घोषणा केली होती, तर शिवसेना हिंदी पुस्तकांची तसेच जीआरची होळी करत तीव्र निषेध नोंदवला होता. विरोधी पक्षांनी केंद्र सरकारचे भाषा धोरण राज्यावर लादण्याचा आरोप केला होता. त्यामुळे मराठी अस्मितेचा मुद्दा गाजला आणि जनतेतून मोठा विरोध होऊ लागला. राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) अंतर्गत त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार एक मातृभाषा, एक हिंदी आणि एक इंग्रजी भाषा शिकवली जाणार होती. मात्र, मराठी संस्कृती आणि भाषेवर परिणाम होईल, या भीतीमुळे हा निर्णय वादात सापडला होता. राजकीय विश्लेषकांच्या मते, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या निवडणुका लक्षात घेता, मराठी अस्मिता या संवेदनशील मुद्द्यावर सरकारने माघार घेतली आहे. जनभावनेचा आदर केल्याचे दाखवत तात्पुरता तरी निर्णय रद्द करून पुढील निर्णयासाठी समितीकडे पाहिले जात आहे. दरम्यान, हिंदी संबंधीचे जीआर. रद्द झाल्याने ५ जुलैचा मोर्चा रद्द केल्याचे शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांची सोशल मीडियात घोषणा.

**मराठी अभ्यास केंद्राचे दीपक पवार यांचे अभिनंदन केले पाहिजे. एक प्राध्यापक असे भाषिक आंदोलन उभे करून मोदीशा– फडणवीस– संघाच्या ताकदीला आव्हान देतो व आंदोलन यशस्वी करून दाखवतो, हे महाराष्ट्राने पाहिले.**

– संजय शास्त्री



## एकल महिलांच्या प्रश्नांवर डॉ. गोऱ्हे यांची बैठक

**मुंबई | प्रतिनिधी**

एकल महिलांच्या विविध समस्यांबाबत संवेदनशीलतेने आणि गांभीर्याने विचार व्हावा, या हेतूने विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विशेष बैठक घेतली. सुट्टीचा दिवस आणि अधिवेशनपूर्व तयारीची गडबड असतानाही त्यांनी विधानपरिषद कार्यालयात ही बैठक घेतल्याने विशेषतः महिलांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर सचिव व्ही. राधा, सचिव विमला, महिला व बालकल्याण विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याच्या शक्यतांवर या बैठकीत चर्चा झाली. एकल महिलांना रोजगाराच्या संधी, त्यांच्यासमोरील सामाजिक व आर्थिक अडचणी, तसेच विविध विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा एकत्रित आढावा यावरही सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीत 'साऊ एकल महिला समिती'चे अभ्यासू कार्यकर्ते मिलिंदकुमार साळवे, जिल्हा समन्वयक अशोक कुटे, विद्या गडाख यांची उपस्थिती होती. या चर्चेमुळे एकल महिलांचा मुद्दा मंत्रालयाच्या पातळीवर अधिक प्रभावीपणे मांडला जाणार असल्याचा विश्वास हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केला. ''एकल महिलांसाठी विविध विभागांना एकत्र आणून समन्वय साधणे हे मोठे आणि गरजेचे काम आज नीलमताईंनी केलं आहे,'' असेही कुलकर्णी म्हणाले.

## सुजाता सौनिक यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

### प्रशासकीय सेवेतील कुशल कार्याची दखल



**मुंबई | प्रतिनिधी**

राज्याच्या मुख्य सचिवपदावर कार्यरत असलेल्या ज्येष्ठ आयएएस अधिकारी श्रीमती सुजाता सौनिक यांचा सेवानिवृत्तीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे अत्यंत सन्मानपूर्वक पार पडला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सौनिक यांच्या दीर्घ सेवेला आणि कुशल प्रशासकीय नेतृत्वाला उच्च दर्जाची दाद दिली. त्यांनी सांगितले की, ''सजग प्रशासन, सुसंवाद व शिस्तबद्ध कामकाज यासाठी सुजाता सौनिक यांनी कायमच एक आदर्श ठेवला. आपत्ती व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, महिला सक्षमीकरण यांसारख्या क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले.'' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सौनिक यांच्या शांत, समंजस आणि ठाम प्रशासकीय निर्णयशक्तीचे कौतुक करत सांगितले की, ''सोनिक यांचे नेतृत्व हे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेसाठी प्रेरणादायी ठरले आहे.'' उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही त्यांच्या उत्कृष्ट शासकीय कार्यक्षमतेची प्रशंसा करत सांगितले की, ''त्यांनी अनेक संकटांचा सामना शांतपणे करत सरकार आणि जनतेमध्ये विश्वासाचे सेतू निर्माण केले.'' यावेळी शासनातील वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख आणि सौनिक यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्याबरोबरचे अनुभव, कार्यशैली आणि सहकार्य याविषयी मनोगत व्यक्त केले. सौनिक यांनी आपल्या उत्तराभाषणात सांगितले की, ''राज्याच्या व जनतेच्या सेवेची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. या प्रवासात सहकार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे मी आभार मानते.'' सत्कारप्रसंगी पुष्पगुच्छ, शाल–श्रीफळ, आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा सत्कार कार्यक्रम केवळ एक सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा निरोप नव्हता, तर राज्याच्या प्रशासनाला दिशा देणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या कार्याची शासकीय स्तरावर घेतलेली प्रामाणिक दखल होती.

# भाकप राज्य सचिवपदी ॲड. सुभाष लांडे यांची फेरनिवड

## सचिव मंडळात नगरच्या पदाधिकाऱ्यांना संधी

अहमदनगर । प्रतिनिधी

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य अधिवेशन नुकतेच नाशिक येथे पार पडले. या अधिवेशनात पुढील तीन वर्षांसाठी राज्यस्तरीय पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि राज्य कौन्सिलची निवड करण्यात आली. यामध्ये अहमदनगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, कॉ. ॲड. सुभाष लांडे यांची राज्य सेक्रेटरीपदी फेरनिवड करण्यात आली आहे. या अधिवेशनात कॉ. राजू देसले (नाशिक) आणि कॉ. शाम काळे (नागपूर) यांची सहसेक्रेटरीपदी निवड करण्यात आली. यामुळे पक्षाच्या नेतृत्वात विविध भागातील प्रतिनिधींना संधी मिळाल्याचे चित्र दिसून आले. सुमारे पन्नास वर्षांनंतर जिल्ह्याला पुन्हा एकदा राज्य सेक्रेटरीपदाचा मान मिळाला आहे. यापूर्वी माजी आमदार कॉ. एकनाथ भागवत हे जवळपास दहा ते बारा वर्षे राज्य सेक्रेटरी म्हणून


ॲड.सुभाष लांडे


कॉ. स्मिता पानसरे


ॲड. बन्सी सातपुते


ॲड सुधीर टोकेकर


निवृत्ती दातीर


ज्ञानदेव सहाने


संदीप इथापे


भारती न्यालपेल्ली

कार्यरत होते. आता कॉ. लांडे यांच्या रूपाने जिल्ह्याचा प्रतिनिधी पुन्हा या सर्वोच्च राज्यपदावर पोहोचला आहे. राज्य सचिव मंडळात (११ सदस्यीय) अहिल्यानगरच्या कॉ. स्मिता पानसरे यांची निवड झाली आहे. तर २१ सदस्यीय राज्य कार्यकारिणीत ॲड. बन्सी सातपुते यांचा समावेश झाला आहे. याशिवाय ७५ सदस्यीय राज्य कौन्सिलमध्ये कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. ज्ञानदेव सहाने, कॉ. भारती न्यालपेल्ली, निवृत्ती दातीर आणि संदीप इथापे यांना स्थान मिळाले आहे. या अधिवेशनास राष्ट्रीय सचिव कॉ. अमरजीत कौर, डॉ. भालचंद्र कांगो आणि कॉ. पद्मा पश्या यांची प्रमुख उपस्थिती होती. तीन दिवस चाललेल्या या अधिवेशनात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, तसेच देशातील व राज्यातील राजकीय परिस्थितीवर सखोल चर्चा करण्यात आली. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी भविष्यातील उपाययोजना आणि संघटनात्मक रणनीतीवर चर्चा झाली. पक्षाची भूमिका अधिक प्रभावी व्हावी यासाठी मार्गदर्शक तत्वे आणि योजनांचे नियोजन या अधिवेशनात निश्चित करण्यात आले. या अधिवेशनात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, लोकशाही विरोधी जनसुरक्षा विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी, ९ जुलै रोजी होणाऱ्या कामगारशेतकरी संपाला पाठिंबा, वाढती महागाई रोखण्यासाठी उपाय, तसेच पहिलीपासून हिंदी भाषा लादण्याचा निर्णय रद्द करावा या विषयांवर आधारित ३७ ठराव मंजूर करण्यात आले.



# मनपा शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## यशवंती मराठा महिला मंडळाचा प्रेरणादायी उपक्रम

अहमदनगर । प्रतिनिधी

यशवंती मराठा महिला मंडळाच्या वतीने रेल्वे स्टेशन येथील महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शिक्षणास प्रेरणा देणारा हा कार्यक्रम महिलांच्या पुढाकारातून पार पडला.

कार्यक्रमास मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे, जिल्हाध्यक्षा गीतांजली काळे, उपाध्यक्षा शीला शिंदे, संघटक शोभा भालसिंग, सुरेखा खैरे, कविता दरंदले, आशा शिंदे, मंगल शिरसाठ, विद्या काळे, सारिका खांदवे, अर्पणा शेलार, तसेच शाळेचे शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मायाताई कोल्हे म्हणाल्या की, ''शाळा मोठी वा लहान असो, जिद्द व चिकाटीने विद्यार्थी नक्की यशस्वी होतात. महापालिकेच्या शाळा सर्वसामान्य वर्गातील विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य करत आहेत.'' गीतांजली काळे यांनी शिक्षकांच्या मेहनतीमुळेच भावी पिढी घडते हे नमूद करताना, मंडळ शिक्षणासाठी प्रेरणादायी कार्य करत असल्याचे सांगितले. शीला शिंदे यांनी शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत असल्याचे सांगितले, तर शोभा भालसिंग यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार आत्मसात करण्याचे आवाहन केले. सुरेखा खैरे म्हणाल्या की, शिक्षण हे आत्मविश्वासाचे मूळ असून, यशाच्या पहिल्या पायरीसाठी शिक्षण आवश्यक आहे. मुख्याध्यापक विजय दिघे यांनी महिलांनी उचललेले पाऊल प्रेरणादायी असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांना यातून दिशा मिळेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन भारती कवडे यांनी केले.

# डॉ. विखे अभियांत्रिकीतील २३ विद्यार्थ्यांना नोकरी

अहमदनगर । विजय मते



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईनफ्विभागाने यशाचा नवा शिखर गाठत २३ विद्यार्थ्यांना नामांकित आयटी कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळवून दिली आहे. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये ११ आघाडीच्या कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांची योग्यता चाचणी, तांत्रिक मुलाखत व प्रत्यक्ष मुलाखती अशा तीन टप्प्यांतून निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेतून सीएसडी विभागातील कु. ऐश्वर्या काकडे हिची इन्फोसिसमध्ये, कु. आदिती कळमकर व ओम राऊत यांची एलटीआय माईंडट्री या नामांकित मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये निवड होणे हे विभागासाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. एकूण निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ₹४ ते ₹६ लाखांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ''या यशाचे संपूर्ण श्रेय महाविद्यालयाच्या प्राध्यापक, संस्थेच्या प्रभावी मार्गदर्शनाला व पालकांच्या सततच्या पाठबळाला जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश नक्कीच प्रेरणादायी ठरेल.'' इन्फोसिस (मुंबई/पुणे), कॉग्निझंट टेक्नॉलॉजी, कोरिझो (बंगळुरू), न्युमेट्री टेक्नॉलॉजी, फॉर्च्यून क्लाऊड, पार्श इन्फोटेक (नाशिक), सुदरलॅण्ड, ईगल बाईट, टेक्नोग्रोथ, क्युस्पायडर व किरण ॲकेडमी (पुणे/मुंबई) यांचा समावेश होता. संस्थेचे चेअरमन व पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ. सुजय विखे, डायरेक्टर जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, डायरेक्टर (टेक्निकल) प्रा. सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, विभागप्रमुख डॉ. रविंद्र तांबे, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. सुदर्शन दिवटे, समन्वयक प्रा. श्रीकांत गागरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आंबेडकरी समाज याचा तीव्र विरोध रस्त्यावर उतरून करेल– गायकवाड

अहमदनगर । प्रतिनिधी

रा.स्व.संघाचे सहकार्यवाह दत्तात्रेय होसबळे आणि देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी भारतीय संविधानातील 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे शब्द प्रस्तावनेमधून हटवण्याचे जाहीर समर्थन केल्यामुळे देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या वक्तव्याचा भारतीय लोकशाही आणि संविधानाच्या आत्म्यावर घात असल्याचा आरोप करत ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड यांनी याला जोरदार विरोध नोंदवला आहे. गायकवाड म्हणाले की, भारत हा विविध जाती, उपजाती, पंथ आणि धर्मांनी युक्त असा देश आहे. देशातील सर्व घटकांना भारतीय संविधानाने समता आणि संरक्षणाची हमी दिली आहे. अशा परिस्थितीत प्रस्तावनेतील 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे शब्द हटवण्याचा प्रयत्न म्हणजे संविधानातील आत्माच संपवण्याचा डाव आहे. आरएसएसच्या हिंदू राष्ट्र स्थापनेच्या अजेंड्यानुसार हा कानोसा घेण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाण्यात दगड टाकून लोकांचा प्रतिसाद मोजण्याचा हा प्रकार असून, भारतीय जनता आणि विशेषतः आंबेडकरी समाज याचा तीव्र विरोध रस्त्यावर उतरून करेल, असेही गायकवाड यांनी इशारावजा भाषेत सांगितले.



या वक्तव्यांचा निषेध करताना गायकवाड म्हणाले, देशात सर्व धर्म, पंथ आणि जातीजमाती शांततेने एकत्र नांदत आहेत. अशा वेळी हे शब्द हटवण्याची मागणी करणे म्हणजे संविधानाच्या मुल्यांवरच आघात करणे आहे. या पार्श्वभूमीवर देशातील सर्व प्रगतीशील आणि संविधानप्रेमी घटकांनी एकत्र येऊन या विचारसरणीचा विरोध करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.


# अवतार मेहेरबाबा सेंटरचा ६६ वा वर्धापनदिन साजरा

अहमदनगर । प्रतिनिधी

सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर सेंटरचा ६६ वा वर्धापन दिन २९ जून रोजी साजरा करण्यात येणार असून, यानिमित्त भजन, आरती, प्रार्थना, सुगमसंगीत, शास्त्रीय व भक्तिगीत गायन, वादन, कव्वाली, अभंग वाणी व नृत्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती सेंटरचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. मेहेरबाबांचे जगभर विविध ठिकाणी केंद्र होते. मात्र नगरमध्ये नव्हते. त्यामुळे मेहेरबाबांनीच येथे सेंटर स्थापन करण्याची सूचना केली होती. प्रारंभी काही मेहेरप्रेमींच्या घरी दर शनिवारी कार्यक्रम आयोजित केले जात. पहिला कार्यक्रम माणिक हाथीदारू यांच्या घरी झाला. त्यानंतर शास्त्री मॅडम, भगीरथ तिवारी आदींच्या घरीही कार्यक्रम झाले. मात्र त्या काळात वाहन व संवाद सुविधा अभावात असल्याने एकत्रित स्थळाची गरज भासली. तेव्हा आदी इराणी यांनी सरोष पेट्रोल पंपाशेजारील जागेतील एक खोली दिली. २९ जूनला त्या ठिकाणी पहिला कार्यक्रम भरवून मेहेरबाबा नगर सेंटरची स्थापना झाली. विशेष म्हणजे या सेंटरचे उद्घाटन अवतार मेहेरबाबांनी स्वतः केले होते.




औक्षवंत व्हा!



कु. अनुप्रिता हिस वाढदिवसाच्या शुभेच्छा


अनुप्रिता प्रणिता अतुल देठे

डॉन बॉस्को इंग्लिश मिडीयम स्कूल

शुभेच्छूक- पप्पा, मम्मी, भाऊ बहीण, आज्जी, आजोबा

समस्त देठे परिवार, बोल्हेगाव

औक्षवंत व्हा!



कु. नेरिया हिस वाढदिवसाच्या शुभेच्छा

नेरिया शीतल चंद्रकांत देठे

ऑक्झिलिअम कॉन्व्हेन्ट स्कूल

शुभेच्छूक- पप्पा, मम्मी, भाऊ बहीण, आज्जी, आजोबा

समस्त देठे परिवार, बोल्हेगाव



# खुलताबाद श्रीलक्ष्मी नरसिंह पालखी दिंडीचे स्वागत

अहमदनगर । विजय मते

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील पाडळी (देवाची) येथून श्री लक्ष्मी नरसिंह पालखीची पायी दिंडी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करत आहे. या दिंडीचे नगरमधील गजराज नगर येथे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी भिखन सूर्यवंशी व स्वाती सूर्यवंशी यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. दिंडी चालक हभप धनंजय महाराज म्हस्के यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

ही दिंडी आपल्या ८व्या वर्षात पदार्पण करत असून, सूर्यवंशी परिवारातर्फे २०० वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. या सेवाकार्यात वाल्मिक सूर्यवंशी, मधुकर काटे, लहानु दिवेकर, भुजंग कवडे, ज्ञानेश्वर सूर्यवंशी व मारुती बोरुडे यांचे मोलाचे योगदान राहिले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# नागवडे कारखान्यामुळे तालुक्याचा कायापालट- चेअरमन राजेंद्र नागवडे

## ५१ व्या गळीत हंगाम तयारीस प्रारंभ | मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्यामुळे श्रीगोंदा तालुक्याचा खऱ्या अर्थाने कायापालट झाला असून, तालुका आज वैभवाच्या शिखरावर पोहोचला आहे. या सहकार गंगोत्रीचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. यासाठी सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांनी सक्रिय सहभाग देणे आवश्यक आहे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले. २०२५२६ या गळीत हंगामाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून मिल रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, संचालक सावता हिरवे व प्रवीण लबडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हाईस चेअरमन बाबासाहेब भोस हे होते. राजेंद्रदादा नागवडे म्हणाले, ''आज सहकारी साखर उद्योगाला खाजगी कारखान्यांशी कडवी स्पर्धा करावी लागत आहे. दिवसेंदिवस खर्च वाढत असतानाही गाळप हंगामाचे दिवस कमी होत चालले आहेत. पूर्वी १७० ते १९० दिवस चालणारा हंगाम आता केवळ ११०१२० दिवसांपर्यंत मर्यादित झाला आहे. अशा परिस्थितीत कारखान्याचे आर्थिक संतुलन राखणे मोठे आव्हान बनले आहे.'' ''स्वर्गीय शिवाजीराव बापूंनी साठ वर्षांपूर्वी उभ्या केलेल्या या सहकारी चळवळीचा ५१व्या हंगामाचा प्रारंभ करताना अभिमान वाटतो. बापूंच्या विचारांचा वारसा आणि सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने आजवर सभासद आणि शेतकऱ्यांना चांगला ऊस दर देण्याची भूमिका आम्ही यशस्वीपणे पार पाडली आहे. भविष्यातही नागवडे कारखाना उसाच्या दरात मागे राहणार नाही. मात्र, यासाठी शेतकऱ्यांनी आपला ऊस आपल्याच कारखान्याला गाळपासाठी द्यावा, अशी विनंती त्यांनी केली. व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस म्हणाले, ''स्व. बापूंच्या विचारांचा वारसा घेऊन राजेंद्रदादांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळ एकदिलाने कार्यरत आहे. जिल्ह्यात नागवडे कारखाना अग्रगण्य ऊस दर देण्यासाठी प्रसिद्ध आहे. भविष्यात ही संस्था आणखी बळकट होण्यासाठी सर्व सभासद व शेतकऱ्यांचे सहकार्य आवश्यक आहे.'' कार्यक्रमात केनयार्ड विभागातील भाऊसाहेब पडळकर, हनुमंत काळे आणि उत्तम दरेकर यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करण्यात आला आणि त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी संचालक श्रीनिवास घाटगे, राकेश पाचपुते, प्रशांत दरेकर, योगेश भोईटे, डी. आर. काकडे, प्रा. सुरेश रसाळ, बंडू जगताप, संदीप औटी, दत्तात्रय कातोरे, सरपंच प्रवीण शिर्के, प्रा. भगवान शिर्के, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांच्यासह कारखान्याचे खातेप्रमुख, कामगार आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक भाऊसाहेब नेटके यांनी तर आभारप्रदर्शन शरद जगताप यांनी केले.



# घरकुल योजनेत पाथर्डीचा राज्यात प्रथम क्रमांक

**पाथर्डी । प्रतिनिधी**

घरकुल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत पाथर्डी तालुका पंचायत समितीला राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. चालू वर्षात तालुक्यातील १०८ गावांमधील एकूण ७२१६ पात्र लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली असून, प्रत्येक लाभार्थ्याला शासनाकडून ५ ब्रास वाळू मोफत देण्यात येणार आहे. मात्र, वाळूची वाहतूक लाभार्थ्यांनी स्वखर्चाने करायची आहे, अशी माहिती प्रांताधिकारी प्रसाद मते व तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी दिली. प्रांताधिकारी प्रसाद मते म्हणाले, ''शासनाने ग्रामीण भागातील गरजूंसाठी राबवलेली घरकुल योजना अनेक कुटुंबांना स्वतःच्या मालकीची घरे मिळवून देण्यात यशस्वी ठरली आहे. स्वतःच्या घरात राहण्याचा आनंद आणि समाधान याला तोड नाही. शासनाने नागरी व ग्रामीण भागात प्रभावीपणे ही योजना राबवून अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि यंत्रणांना उद्दिष्टपूर्तीसाठी सक्रिय केले आहे.'' पाथर्डी तालुक्यात अधिकारी, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी उत्तम समन्वय राखून योजना यशस्वी केली. यामुळे मागील महिन्यात शासनाच्या वतीने तालुका प्रशासनाचा गौरव करण्यात आला. हे यश केवळ पंचायत समितीचे नसून संपूर्ण प्रशासन व सहकार्य करणाऱ्या यंत्रणांचे आहे, असे मते यांनी स्पष्ट केले.शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक लाभार्थ्याला घरकुल बांधणीसाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. वाळू लाभार्थ्यांच्या जवळच्या अधिकृत वाळू साठ्यांतून दिली जाईल. वाहतूक मात्र लाभार्थ्याने स्वतःच्या खर्चाने करावी लागेल. यासाठी कोणतेही रॉयल्टी किंवा अन्य शासकीय शुल्क आकारले जाणार नाही. संबंधित लाभार्थ्यांना परमिट देण्यात येणार आहे. मान्सूनपूर्व पावसामुळे बांधकामास पूरक वातावरण तयार झाले आहे, आणि त्यामुळे योजनेची अंमलबजावणी अधिक सुलभ होईल, असेही त्यांनी नमूद केले. ''घरकुल योजनेमुळे अनेक कुटुंबांना हक्काचे घर मिळाले आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करत आहोत,'' असे प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी सांगितले.


# लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त राज्यस्तरीय मराठी वक्तृत्व स्पर्धा

**कोपरगाव । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य संग्रामाचे महानायक लोकमान्य गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त पद्मभूषण करमसीभाई सोमैया राज्यस्तरीय मराठी वक्तृत्व स्पर्धेचे भव्य आयोजन कोपरगाव येथे होत आहे. ही स्पर्धा २२ व २३ जुलै २०२५ रोजी सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडियम स्कूल, कोपरगाव यांच्या वतीने घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक सौंदर्य, वैचारिक परिपक्वता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले जात आहे. मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबरच राष्ट्रभक्ती आणि प्रभावी सादरीकरणाच्या कौशल्यांचा विकास या स्पर्धेच्या माध्यमातून साधला जातो. या वर्षीच्या स्पर्धेचे आयोजन अधिक भव्य, व्यापक आणि दर्जात्मक स्वरूपात पार पडणार आहे. केवळ स्पर्धा नव्हे तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची शिदोरी म्हणून ही स्पर्धा ओळखली जाते. मंचावर आत्मविश्वास, विचार मांडण्याची स्पष्टता आणि नेतृत्वगुण यांची घडण यातून होते. या संदर्भात माहिती देताना शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे म्हणाले, ''मराठी भाषेचा अभिमान आणि विचारांची गंगा या स्पर्धेतून अवतरते हेच तिचे खरे यश आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या करिअर घडवण्यासही उपयुक्त ठरते.'' स्पर्धेची वैशिष्ट्ये आणि बक्षिस यामध्ये

प्रथम पारितोषिक : ₹५,०००/- + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक : ₹३,०००/- + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक : ₹२,०००/- + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र, सात उत्कृष्ट स्पर्धकांना: प्रत्येकी ₹१,०००/- + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. ही स्पर्धा राज्यभरातील इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. केवळ स्पर्धा जिंकण्यापुरती मर्यादित न राहता, ही विद्यार्थ्यांच्या भाषिक आणि वैचारिक प्रगल्भतेसाठी एक अमूल्य संधी ठरणार आहे.नावनोंदणीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# अतिक्रमणात कोलमडलेले व्यवसाय पूर्ववत होण्यास सुरुवात

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्यातील पूर्व भागातील बालमटाकळी, बोधेगाव, चापडगाव तसेच राक्षी परिसरातील शेवगावगेवराई राज्य महामार्गालगत अतिक्रमित जागांवरील व्यवसाय सार्वजनिक बांधकाम विभागाने हटविल्याने गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून अनेक छोटे-मोठे व्यवसाय कोलमडले होते. या पार्श्वभूमीवर अनेक व्यापारी, कारागीर आणि मजूर बांधकाम, दुरुस्ती व नुतनीकरणाच्या कामांत गुंतले असून, बाजारपेठ पुन्हा सावरण्याच्या मार्गावर आहे. अतिक्रमण हटविल्यानंतर काही व्यावसायिकांनी मागे सरकून तिथेच नव्याने व्यवसाय सुरू केला, तर अनेकांचा व्यवसाय जागेअभावी बंद पडला. बाजारपेठ स्थिर होण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार असल्याचे स्थानिक व्यापाऱ्यांचे मत आहे. या कठीण काळात बालमटाकळी येथील प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक मज्जितभाई शेख यांनी गावातच नव्याने हॉटेल व्यवसाय सुरू केला. त्यांच्या या नव्या सुरुवातीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, प्रगतशील शेतकरी रंगाभाऊ वैद्य, बालमटाकळी सेवा संस्थेचे माजी चेअरमन हरिश्चंद्र घाडगे, अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष कमुभाई शेख, मधुकर पाटेकर, रमेश शिंदे, समाजसेवक मैनुद्दीन शेख, हरून शेख, पत्रकार इसाक शेख, युवा नेते आप्पासाहेब घुले, बाबाभाई शेख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# मोधळवाडी निसर्गरम्य परिसरात इनोव्हेटर्स पब्लिक स्कूलची वनभोजन सहल

## कृषी पर्यटन केंद्रातील भेटीने विद्यार्थ्यांचा कृषी व निसर्ग अभ्यास

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

इनोव्हेटर्स पब्लिक स्कूल, चंदनापुरी या शाळेच्या एक दिवसीय वनभोजन सहलीचे आयोजन संगमनेर तालुक्यातील मोधळवाडी या निसर्गरम्य ठिकाणी करण्यात आले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील कृषी पर्यटन केंद्रास भेट देऊन निसर्ग, वनस्पती, पक्षी व कृषीविषयक माहितीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. 'क्षेत्रभेट सहल' ही अध्ययनाच्या भिंती ओलांडून शिक्षणाचे प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी असते. विद्यार्थ्यांना यातून केवळ आनंद आणि उत्साहच मिळत नाही, तर नवीन गोष्टी शिकण्याची आणि कौशल्ये विकसित करण्याची मौल्यवान संधी देखील मिळते. या सहलीचे नियोजन नर्सरी, जूनियर केजी, सीनियर केजी, पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. इनोव्हेटर्स पब्लिक स्कूल, चंदनापुरी नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत असल्याने ही सहल त्याच दृष्टिकोनातून राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी कृषी पर्यटन केंद्रातील झाडे, फुले, विविध पक्षी, औषधी वनस्पती, तसेच निसर्गातील विविध घटकांचा थेट अनुभव घेतला. प्रशिक्षित मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना परिसराची वैज्ञानिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती समजावून सांगितली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. त्यांनी सहलीदरम्यान अनेक प्रश्न विचारून जिज्ञासूपणाची झलक दाखवली. ही सहल त्यांच्या अनुभवसंपन्न शिक्षणासाठी अत्यंत फलदायी ठरली. या सहलीचे उत्तम आयोजन मुख्याध्यापिका मनिषा रहाणे व शिक्षकवृंदांनी केले. सहलीच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, वाहक व इतर सहाय्यकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद लुटला असून, भविष्यात अशा शैक्षणिक सहली नियमितपणे आयोजित करण्याची मागणी पालकांकडून करण्यात आली.

# जीवन घडवण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे- गणेश शिंदे

## 'आदि फाउंडेशन'तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

करिअर हे विद्यार्थ्यांच्या संगतीवर आणि अभ्यासावर अवलंबून असते. केवळ गुणांच्या मागे धावून नव्हे, तर बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अभ्यास करत मेहनतीने प्रयत्न केले, तर यश हमखास मिळते, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले. ता. २४ जून रोजी आमरापूर (ता. शेवगाव) येथे आदि फाउंडेशनच्या वतीने आयोजित गुणगौरव समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या सोहळ्यात नुकतीच परीक्षा उत्तीर्ण करणारे ज्ञानेश्वर मुखेकर व सौरव ढाकणे तसेच मधून लेफ्टनंट म्हणून निवड झालेल्या श्रेयस भापकर आणि ईशान चितळे यांचा सत्कार आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मतदारसंघातील विविध शाळांमधील इयत्ता १० वी व १२ वीतील ७५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान शाल व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. शिंदे पुढे म्हणाले की, ''शिवाजी महाराज, संत तुकाराम हे केवळ गुणांसाठी नव्हते, तर त्यांच्या विचारांचे आचरण महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाचा आनंद घेत एकरूपता साधली पाहिजे. केवळ , च नाही तर , सारख्या अनेक क्षेत्रांत संधी आहेत. आयुष्यातील केवळ ४५ वर्ष जर खऱ्या प्रयत्नांनी अभ्यास केला, तर कोणत्याही क्षेत्रात उज्ज्वल करिअर घडू शकते.'' ते पुढे म्हणाले, ''सिस्टम बदलायची असेल, तर तिचा भाग व्हा. संत ज्ञानेश्वरांनी आई-वडिलांचे प्राण दिले, तरीही ते खचले नाहीत. संकटांना न घाबरता अर्जुनासारखे रिंगणात उभे राहा यश निश्चित आहे.'' सौरव ढाकणे यांनी आपल्या अनुभवात सांगितले की, ''ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य मार्गदर्शन घेऊन चिकाटीने अभ्यास केला, तर यश नक्की मिळते. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावेत.'' ईशान चितळे म्हणाले, '', च्या जोडीने आणि स्पर्धा परीक्षांकडेही करिअरच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.'' आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, ''मतदारसंघातील अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या पदांवर काम करत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे. मतदारसंघाच्या जडणघडणीत त्यांच्या योगदानाचे मोल अनमोल आहे.'' यावेळी माजी जि.प. सदस्य राहुल राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, जेष्ठ नेते बापूसाहेब पाटेकर, भाजप प्रदेश सरचिटणीस उमेश भालसिंग, उद्धवराव वाघ, रामकिसन काकडे, नारायण पालवे, काकासाहेब शिंदे, तालुकाध्यक्ष बापूसाहेब पाटेकर, डॉ. मृत्युंजय गर्जे, नंदकुमार शेळके, भगवान साठे, मुकुंद गर्जे, जमीर आतार, संजय टाकळकर, महेश फलके, गणेश कोरडे, नितीन दहिवाळकर, गणेश रांधवणे, भिमराज सागडे, गणेश गरड, उषाताई कंगणकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# वाढती बालगुन्हेगारी धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वादातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती. दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीनवर्षापूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ – २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एकावर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगर मधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# शिक्षक संघटन प्रबळ करण्याची गरज- मोरे



## शिक्षक भारतीची बैठक संपन्न

**अकोले । प्रतिनिधी**

शासनाच्या उदासीन धोरणांमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक निर्णयांची मालिका सुरू असून विरोधी पक्ष सुद्धा या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे संघटन बळकट करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जुनी पेन्शन योजना कोअर कमिटी महाराष्ट्र राज्य सदस्य तथा शिक्षक भारतीचे राज्य कार्याध्यक्ष कॉ. सुभाष मोरे यांनी केले.फ शिक्षक भारतीची अकोले तालुक्यात नुकतीच झालेली महत्त्वपूर्ण बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीस तालुका व जिल्हा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांच्या पुढील प्रमुख समस्या कॉ. मोरे यांनी अधोरेखित केल्या: संच मान्यता अद्याप मागे घेण्यात आलेली नाही. टप्पा अनुदान वितरित न झाल्यामुळे संस्थांना अडचणी. डीसीपीएस, एनपीएस अशा विविध पेन्शन योजनांमुळे मोठा संभ्रम. २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू नसणे ही मोठी विडंबनात्मक बाब. अतिरिक्त शिक्षकांचा पगार बंद, मागील वर्षाचे वेतन थकीत. सीएचबी, अर्धवेळ मान्यता असलेल्या शिक्षकांचे वेतन गेली चार वर्षे अडकल्याने मोठा अन्याय. तब्बल ६ हजार शाळा बंद होण्याच्या मार्गावर. सुभाष मोरे म्हणाले, ''आमदार कपिल पाटील यांनी पूर्वी अनेक प्रश्न विधानसभेत उपस्थित करून मार्ग काढला होता. परंतु सध्याच्या परिस्थितीत शिक्षकांच्या समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने संघटनेची ताकद वाढवणे हेच एकमेव उत्तर आहे.'' या बैठकीत पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, जिल्हा संघटक चंद्रशेखर हासे, कोषाध्यक्ष (माध्यमिक विभाग) सोमनाथ बोंतले, तालुकाध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष गणपत धुमाळ, तसेच दत्तात्रय घुले, प्रवीण मालुंजकर, विजय पांडे, बळीराम फरगडे, वाघमारे, संतोष वाकचौरे, संदीप महाडदेव, विकास आवारी, सुरेश वाकचौरे, आनंद चौधरी आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटित लढा हाच पर्याय आहे, असा निर्धार या बैठकीत सर्व स्तरांवरून व्यक्त करण्यात आला.

**अहिल्यानगर की कचराकुंडी? प्रशासकाची पोलखोल**



प्रशासकीय कारभाराने अहिल्यानगरचा केला उकिरडा, लाखोंची बिले निघुनही शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढिग ! (छाया– एक्सप्रेस फोटो)

# ज्युदो परिक्षेतमधे अमृता झिंजे प्रथम तर कनिका गुप्ता द्वितीय





**अहमदनगर । प्रतिनिधी**

यंग मेन्स ज्युदो अँड मार्शल आर्ट्स असोसिएशनच्या सिद्धिबाग येथील ज्युदो हॉलमध्ये नुकतीच येलो बेल्ट परीक्षा पार पडली. या परीक्षेत १४ खेळाडूंनी यशस्वी कामगिरी करत उज्ज्वल यश संपादन केले. ज्युदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या अभ्यासक्रमानुसार लेखी, तोंडी आणि प्रात्यक्षिक अशा तिन्ही प्रकारांत परीक्षा घेण्यात आली. यामध्ये कु. अमृता अनिकेत झिंजे हिने ९६% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर कनीका गुप्ता हिने ९०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. या परीक्षेत ऋचा बोगा, लाभेश वारनौक, पार्थ दातरंगे, सिद्धी दातरंगे, गार्गी मुळे, स्वरूप जाधव, ओम पोकळे यांनी उच्चश्रेणी मिळवून यश संपादन केले. सम्राट करंजुले, विराट करंजुले आणि अनुज बोगा यांनी प्रथम श्रेणीत परीक्षा उत्तीर्ण केली. या यशस्वी खेळाडूंना संस्थेचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, परीक्षक अजय कुलकर्णी, सय्यद फिरोज मुनीर आणि आदित्य धोपावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष धनंजय जाधव तसेच पॅपिलॉन ज्यूस बारचे संचालक संजय व अजय झिंजे यांनी यशस्वी खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले.

# मंथन सामान्यज्ञान परीक्षेत मनस्वी साखरे राज्यात द्वितीय



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मंथन वेल्फेअर फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित मंथन जनरल नॉलेज एक्झामिनेशन २०२४२५ मध्ये तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीगोंदा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी कु. मनस्वी मनोज साखरे इयत्ता पहिली राज्यात द्वितीय क्रमांक, कु. विराट अविनाश नागवडे इयत्ता पहिली राज्यात सहावा, जिल्ह्यात पहिला कु. अवंती अरुण पवार इयत्ता दुसरी राज्यात सहावा, जिल्ह्यात पहिली, कु. प्रसन्ना सूर्यभान गोलांडे इयत्ता दुसरी राज्यात आठवा, जिल्ह्यात तिसरी, कु. आराध्या संजय कसले इयत्ता दुसरी राज्यात नववा, जिल्ह्यात चौथी ,केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेले विद्यार्थी: कु. समर्थ शिवाजी नागवडे इयत्ता पहिली केंद्रात पहिला, कु. राजवीर महेश साळुंखे इयत्ता पहिली केंद्रात दुसरा, कु. शिवाज्ञा कपिल नागवडे इयत्ता तिसरी केंद्रात पहिली, कु. अंशुमन अशोक गिरमकर इयत्ता तिसरी केंद्रात दुसरा, कु. कनक कुंदन धालवडे इयत्ता तिसरी केंद्रात चौथी, कु. तनिष्का ज्ञानेश्वर खेतमाळीस इयत्ता चौथी केंद्रात दुसरी, कु. उत्कर्षा युवराज कुरुमकर इयत्ता चौथी केंद्रात तिसरी, कु. सुस्मित सुजय व्यवहारे इयत्ता चौथी केंद्रात चौथा, कु. श्रेयश मधुकर पांडुळे इयत्ता आठवी केंद्रात पहिला या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांची लहान वयापासूनच स्पर्धा परीक्षांसाठी तयारी व्हावी यासाठी शाळेमध्ये प्रि–प्रायमरी पासूनच मंथन, ऑलिंपियाड, अबॅकस, एन.एस.ई. यासारख्या परीक्षांचे नियमित प्रशिक्षण दिले जाते, अशी माहिती निरीक्षक एस.पी. गोलांडे यांनी दिली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीतू दुलानी , तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, विश्वस्त अनुराधा नागवडे, निरीक्षक एस.पी. गोलांडे, तसेच संपूर्ण शाळा परिवाराने अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आठवणीतले आबासाहेब पुस्तकाचे प्रकाशन

## समाजासाठी झटलेल्या कर्मयोग्याला आदरांजली



**शेवगाव । नरहरी शहाणे**

शिक्षण आणि सहकाराच्या माध्यमातून समाज उभारणीचे महान कार्य करणारे कॉ. आबासाहेब काकडे हे एक तत्वनिष्ठ, सत्यनिष्ठ आणि समाजाभिमुख नेतृत्व होते. त्यांनी कधीही आपल्या विचारांशी प्रतारणा केली नाही. व्यवस्थेविरुद्ध ठाम भूमिका घेणारी माणसे समाजप्रगतीची लक्षणं असतात. अशाच बंडखोर परंतु सकारात्मक वृत्तीच्या आबासाहेबांनी अनेक शिक्षण संस्था उभ्या करून तळागाळातील लोकांपर्यंत ज्ञानाची गंगा पोहचवली, असे गौरवोद्गार आमदार सत्यजित तांबे यांनी काढले. ता. २८ जून रोजी शेवगाव येथे कॉ. आबासाहेब काकडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात 'आठवणीतले आबासाहेब' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. याच वेळी इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कोर्स' आणि 'पाककला शिक्षण उपक्रम' यांचाही उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, माजी जि.प. सदस्य विक्रम तांबे, 'चपराक' प्रकाशनचे संपादक व कार्यक्रमाचे अध्यक्ष घनश्याम पाटील, पुस्तकाचे संपादक व राज्य अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य प्रा. संदीप वाकचौरे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, माजी सभापती सौ. हर्षदा काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, जगन्नाथ गावडे, ॲड. सुभाष भोर, अभिजीत लुनिया, गोरक्ष मदने, सुधीर तनपुरे, डॉ. अमोल फडके, डॉ. हेमलता लाखे, शुभांगी पाटील, प्रा. रामराजे लाखे, अनिल पाटील, प्राचार्य संपत दसपुते आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार तांबे पुढे म्हणाले की, ''गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणसंस्था, वसतिगृहे सुरू करून आबासाहेबांनी समाजासाठी आयुष्य समर्पित केले. आज त्यांच्या कार्याचा गंध अनेक यशस्वी लोकांमध्ये दिसतो. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचा संघर्ष सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी होता.'' पुस्तकाचे संपादक प्रा. संदीप वाकचौरे म्हणाले, ''समाजासाठी तळमळ असणारी माणसेच सामाजिक चळवळी घडवतात. अलीकडे अशा व्यक्ती दुर्मिळ झाल्या आहेत. 'आठवणीतले आबासाहेब' हे पुस्तक अशाच एका जिवंत प्रेरणास्त्रोताची आठवण करून देणारे आहे.'' आमदार तांबे यांनी सांगितले की, ''जगाशी नाते जोडणाऱ्या नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देणे ही काळाची गरज आहे. जिल्ह्यात प्रथमच AI (Artificial Intelligence) कोर्स सुरू होत असल्याचा अभिमान आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गोविंद वाणी व प्रा. जरीना शेख यांनी तर सांगता 'वंदे मातरम्' गीताने करण्यात आली.